| Publication : Lokmat | Subject : AVI Press Confrence in Delhi |
|---|---|
| Date of Publish : 12th August 2018 | Edition : National |

लोकमत

# ‘ई-सिगारेट’बंदी; सीएचआरए व एव्हीआयचा आक्षेप

## धूम्रपान सोडण्यास प्रवृत्त करण्यासाठी योग्य पर्याय आवश्यक



लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ‘ई-सिगारेट’वर लावण्यात आलेल्या बंदीवर काऊंसिल फॉर हार्म रिड्युस्ड अल्टरनेटिव्ज (सीएचआरए) तसेच असोसिएशन ऑफ वेपर्स इंडिया (एव्हीआय) ने आक्षेप घेतला आहे. लाखो धूम्रपानकर्ते सुरक्षित पर्यायांपासून या बंदीमुळे वंचित राहतील, असा भीतीवजा इशारा या संघटनांनी केंद्र तसेच राज्य सरकारांना दिला आहे. सार्वजनिक ठिकाणी निर्णयाचा बराच नकारात्मक प्रभाव दिसेल असा दावाही करण्यात आला आहे.

सुरक्षित पर्यायांच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणाऱ्या नुकसानाला कमी करण्यासाठी सीएचआरए काम करते. तर, एव्हीआय ई-सिगारेटचे प्रतिनिधित्व करणारा समूह आहे.

**धूम्रपानकर्त्यांच्या संख्येत घट**

अमेरिका,युरोप तसेच युकेसारख्या विकसित देशात ई-सिगारेटचा वापरानंतर चांगले परिणाम दिसून आले आहे. या देशातील धूम्रपानकर्त्यांच्या संख्या वेगाने घट झाली आहे. भारतात मात्र, स्मोकिंगचे प्रमाण वेगाने वाढत आहे. अशात धूम्रपानकर्त्यांच्या इच्छाशक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी दुसरे पर्यायही उपलब्ध करवून देण्यासंबधी गांभीर्याने विचार केला पाहिजे, असे मत एव्हीआय चे संचालक प्रतीक गुप्ता यांनी व्यक्त केले आहे.

### ई-सिगारेट म्हणजे काय?

- जिचा सिगारेटसारखा धूर होत नाही, अशी सिगारेट म्हणजे 'ई- सिगारेट' किंवा 'इलेक्ट्रॉनिक सिगारेट'. तंबाखूजन्य सिगारेट न ओढता तंबाखूमध्ये असलेले निकोटिन हे द्रव्य शरीरात घेण्याचा एक मार्ग म्हणून ही सिगारेट वापरली जाते. ई-सिगारेटमध्ये तंबाखू नव्हे, तर थेट द्रवरुपातले निकोटिन असते. ही सिगारेट पेटवण्यासाठी लाईटर किंवा काडेपेटी लागत नाही, कारण या सिगारेटच्या उपकरणात एका लहानशा बॅटरीचा समावेश असतो. जेव्हा सिगारेट ओढण्याची कृती केली जाते तेव्हा या सिगारेटमधील द्रवरुप निकोटिनची वाफ तयार होऊन ती ओढली जाते. या वाफेला प्रत्यक्ष धूम्रपान केल्यासारखा वास नसतो. सिगारेट प्रत्यक्ष पेटवली जात नसल्यामुळे त्यापासून राखही तयार होत नाही.

### धूम्रपानासाठी 'ई-सिगारेट' योग्य पर्याय !

- सिगारेटच्या तुलनेत ई-सिगारेट जवळपास ९५ टक्के कमी नुकसानदायक असते. सिगारेट पेटवल्यामुळे निघणारे विषारी रसायन तसेच टार हे तंबाखूजन्य रोगाचे प्रमुख कारण आहे. ई-सिगारेटमध्ये निकोटीन असते मात्र, इलेक्ट्रॉनिक असल्याने ती टाररहित असते.

> ई-सिगारेट वर बंदी घातल्यामुळे १२ कोटी धूम्रपानकर्ते कमी धोका असलेल्या निकोटिनच्या सेवनापासून वंचित राहतील.प्रदूषण कमी करणाऱ्यासाठी पर्यायी वाहनांचा पर्याय शोधला जातो. अशात तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणाऱ्या आजारांना आटोक्यात आणण्यासाठी अशा पर्यायांचा वापर केला जाऊ शकतो. टार सारख्या घातक रसायनापासून त्यामुळे बचाव केला जाऊ शकतो.
>
> **सम्राट चौधरी**, संचालक,सीएचआरए